राज्याचे क्रीडा धोरण २०१२
क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२६०/क्रीयुसे-१,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीख: १ मार्च, २०१४

**वाचा :-**

१) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य पर्यटन व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र. पीएचई-१०९३/प्र.क्र.१४८ /क्रीयुसे-१/ दि.२८ नोव्हेंबर, १९९५.

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र.राक्रीधो-२०११/प्र.क्र.५५/क्रीयुसे-१ दिनांक १४ जून,२०१२

**प्रस्तावना :-**

राज्य क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य रहावे नागरिकांमध्ये व्यायामाची आवड जोपासावी,राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाच्या दर्जात सुधारणा, खेळाडूंचा गौरव, दर्जेदार क्रीडा सुविधा याबाबी केंद्र बिंदू मानून खेळाडूंसाठी हितावह योजना राज्यात राबविण्यासाठी क्रीडा धोरण,२०१२ तयार करण्यात आलेले आहे.

या राज्य क्रीडा धोरणातील एक महत्वाची व प्रमुख शिफारस क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करणे असे आहे. केंद्र शासनाने खेळाडू तयार होण्यासाठी अद्यावत क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी जी योजना ५०:५० या तत्वावर सुरु केली होती ती २००५-२००६ पासून बंद करण्यात आली असल्याने खाजगी /स्थानिक स्वराज्य संस्था ज्यांच्याकडे स्वत:चे मैदान व अल्प आर्थिक तरतूद आहे त्यांना क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी येणारी अडचण, तसेच वाढत्या शहरीकरणामुळे विद्यार्थ्यांना व तरुणांना व्यायामासाठी व खेळासाठी मिळणारा अल्प वेळ त्या अनुषंगाने किमान अंतरावर खेळ व व्यायाम सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी बाब लक्षात घेऊन ७५:२५ शासन व संस्था हिस्सा या प्रमाणात योजना राबविण्याची शिफारस आहे. त्या अनुषंगाने क्रीडा सुविधा निर्मितीस व क्रीडा साहित्यासाठी अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:- या योजनेस “क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी आर्थिक सहाय्य” असे संबोधण्यात यावे.**

१) **योजनेचे उद्दिष्ट :-** राज्यातील शैक्षणिक संस्था, खाजगी क्लब, क्रीडा मंडळे, प्राधिकरणे, स्थानिक स्वराज्य संस्था यामधून दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करणे, त्यामुळे खेळाडूंच्या कामगिरीत वाढ होऊन आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू निर्माण होण्यास मदत होईल.

२) **योजनेचे स्वरुप :-** क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य याचा तपशील प्रपत्र “अ” मध्ये क्रीडा साहित्यासाठी आर्थिक सहाय्य व मर्यादा याचा तपशील प्रपत्र “ब”मध्ये दर्शविला आहे.

**३) अनुदानासाठी पात्र संस्था :-** अद्ययावत क्रीडा सुविधा निर्मिती, क्रीडा साहित्य अनुदानासाठी खालील नमूद केलेल्या विविध संस्थांना पात्र समजण्यात येईल.

१) खाजगी/शासनाच्या मार्फत चालविण्यात येणा-या व राज्य शासनाच्या संबंधित विभागाने दिलेल्या मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, तंत्र शिक्षण व वैद्यकीय महाविद्यालय इत्यादी.

२) स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविण्यात येणा-या प्राथमिक/माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय.

३) विविध खेळाच्या विकासासाठी कार्यरत असणा-या व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम-१९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम-१८६० अन्वये पंजीबध्द असतील अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, एकविध खेळाच्या क्रीडा संघटना, युवा मंडळे व महिला मंडळे.

४) स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद.

५) आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या आश्रमशाळा.

६) राज्य शासनाच्या वतीने विकसित करण्यात आलेली विभाग, जिल्हा, तालुका व ग्राम क्रीडा संकुले.

**४) अनुदान मंजुरीच्या अटी व शर्ती -**

**(अ) क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्याबाबत.**

**१)** वर नमूद संस्थानी विहित नमुन्यातील अनुदानाचे अर्ज संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावेत.

**२)** अनुदान प्राप्त संस्थेकडे स्वत:च्या मालकीची अथवा दीर्घ मुदतीच्या नोंदणीकृत करारावर (१५ वर्षे किंवा अधिक) जागा असणे आवश्यक आहे. दीर्घ मुदतीच्या कराराचा विचार करीत असताना, अर्ज करणा-या संस्थेकडे अर्ज करित असताना उपरोक्त नमूद केलेल्या १५ वर्षामधील करारापैकी अर्ज करतेवेळी किमान १० वर्षे पुढे करार असणे आवश्यक राहील.

**३)** अनुदान मंजूर झाल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या क्रीडा सुविधा शासकीय उपक्रमासाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. संस्थेच्या सभासद/विद्यार्थी यांच्याशिवाय सदर सुविधा अल्पदरात इतर खेळाडूंना उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

**४)** ज्या ज्या शैक्षणिक संस्थांना अनुदान मंजूर केले जाईल, त्यांनी शासकीय शालेय क्रीडा स्पर्धेत नियमितपणे सहभागी होणे अनिवार्य राहील.

**५)** परिपूर्ण प्रस्तावांना प्रथम तत्वत: मान्यता देण्यात येईल व संस्थेने प्रपत्र “अ” व “ब” मध्ये दर्शविल्याप्रमाणे अंदाजित खर्चाच्या किमान २५ टक्के रक्कम स्वत:चा हिस्सा प्रथम खर्च करणे आवश्यक राहील.

**६)** क्रीडा सुविधा निर्मितीसाठी मंजूर अनुदानाव्यतिरिक्त बांधकामावर होणारा जादा खर्च संबंधित संस्थेस करावा लागेल.

७) निर्माण केलेल्या सुविधाच्या देखभालीचा खर्च संबंधित संस्थेस करावा लागेल.

८) निर्माण केलेल्या सुविधांचा वापर क्रीडा विषयक बाबींशिवाय इतर कारणासाठी करता येणार नाही.

९) बांधकामासंदर्भात एका संस्थेस एका प्रकल्पासाठी फक्त एकदाच आर्थिक अनुदान मंजूर करण्यात येईल.

१०) प्रकल्पाचे अंदाजपत्रके, आराखडे, शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सक्षम अधिका-याने मान्य केलेले असावेत.

११) प्रकल्पाच्या बांधकामाची परवानगी सक्षम स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेली असावी.

१२) प्रकल्प तत्वत: मान्य केल्यानंतर संस्थेने स्वत:चा अंदाजित खर्चाच्या किमान २५टक्के केल्यानंतर बांधकामाच्या सद्य:स्थितीतील फोटोसह सनदी लेखापालाच्या स्वाक्षरीचे खर्चाचे विवरणपत्र सादर केल्यानंतर मंजूर करण्यात आलेली अनुदानाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार वितरीत करण्यात येईल.

१३) अनुदान मंजूरीपूर्वी जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी स्वत: भेट देऊन खात्री करुन अहवाल देणे आवश्यक आहे.

१४) अनुदान वितरीत केल्यानंतर सदर अनुदानाचा विनियोग एक वर्षाच्या आत करुन विनियोग प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

१५) शासनाचे अनुदान पूर्णपणे वितरीत झाल्यानंतर प्रकल्प पूर्णत्वाचा दाखला प्रकल्पाच्या छायाचित्रासह व उपयोगिता प्रमाणपत्रासह सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा मंजूर अनुदान संस्थेकडून शासनाच्या प्रचलित व्याज दराने अनुदान वितरीत झाल्याच्या दिनांकापासून वसुल करण्यात येईल.

१६) संबंधित योजनेवरील प्रशासकीय बाबींच्या खर्चासाठी मंजूर अनुदानाच्या २टक्के निधी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात येईल.

**(ब) क्रीडा साहित्यासाठी आर्थिक सहाय्याबाबत-** क्रीडा साहित्यासाठी अनुदान मंजूर करीत असताना खालील बाबींची पूर्तता व अटींचे पालन करण्यात यावे.

१) संबंधित संस्थेकडे स्वत:च्या मालकीच्या क्रीडा सुविधा उपलब्ध असणे अथवा ज्या ठिकाणी सबंधित खेळाचा सराव करण्यात येतो त्याबाबतचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

२) संबंधित संस्थेने अर्जासोबत संस्थेमधील खेळाडूंच्या अधिकृत क्रीडा स्पर्धेमधील कामगिरीबाबत क्रीडा विषयक अहवाल जोडणे आवश्यक राहील.

३) संबंधित संस्थेच्या क्रीडा विषयक अहवालामध्ये संबंधित संस्थेचे खेळाडू किमान राज्यस्तरावर खेळणे आवश्यक राहील.

४) अनुदान मंजूर करीत असताना एकूण प्राप्त प्रस्तावामध्ये प्रथम आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील कामगिरी लक्षात घेऊन संस्थांचा प्राधान्यक्रम ठरविण्यात येईल.

५) संस्थेने आवश्यक असणा-या साहित्याची यादी कंपनीच्या नावासह अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६) साहित्याच्या अंदाजित खर्चाच्या किमान २५ टक्के अथवा निविदाकरारातील दरानुसार शासन अनुदान मर्यादेपेक्षा लागणारा अधिकचा निधी संस्थेचा हिस्सा म्हणून अनुदान मंजूर केल्यानंतर संचालनालयाकडे जमा करणे आवश्यक राहील.

७) क्रीडा साहित्यामधील अटिकाऊ साहित्यासाठी अनुदान मंजूर केल्यानंतर दोन वर्षे सदर बाबीवर अनुदान मंजूर केले जाणार नाही.

८) क्रीडा साहित्यामधील टिकाऊ साहित्यासाठी अनुदान मंजूर केल्यानंतर पाच वर्षे सदर बाबीवर अनुदान मंजूर केले जाणार नाही.

९) आदिवासी/विशेष घटक क्षेत्रातील संस्थांना १० टक्के स्वहिस्सा खर्च करणे आवश्यक राहिल.

१०) शासकीय संस्थांना स्वहिश्श्याची अट लागू राहणार नाही.

११) क्रीडा साहित्यासाठी एकदा अनुदान मिळाल्यानंतर पाच वर्षापर्यंत पुन्हा अनुदान मिळणार नाही.

५) **अनुदानासाठी अर्ज करण्याची पध्दत –** अनुदान मंजुरीसाठी विहित नमुन्यातील अर्ज खालीलकागदपत्रांसह संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे सादर करावा. संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी सदर संस्थांची प्रत्यक्ष तपासणी करुन अर्ज आपल्या शिफारशीसह विभागीय उपसंचालकांमार्फत संचालनालयास सादर करणे आवश्यक राहील.

i. विविध खेळाच्या विकासासाठी कार्यरत असणा-या व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम-१९५० किंवा संस्था नोंदणी अधिनियम-१८६० अन्वये पंजीबध्द असतील अशा व्यायाम संस्था, क्रीडा मंडळे, एकविध खेळाच्या क्रीडा संघटना, युवा मंडळे व महिला मंडळे याबाबतची प्रमाणपत्र .

ii. जमिनीच्या मालकी हक्क पुराव्यासाठी ७/१२ चा उतारा किंवा दीर्घ मुदतीच्या करारावर (किमान)असलेल्या जमिनीबाबत पुरावा दर्शविणारे करारपत्र नोंदणीकृत असणे आवश्यक.

iii. शासकीय अनुदान घेण्याविषयी व संबंधित बाबींवरील संस्थेचा हिस्सा खर्च करण्याविषयी संस्थेच्या कार्यकारिणीच्या ठरावाची सत्यप्रत.

**iv.** बंदिस्त प्रेक्षागृह तसेच क्रीडा सुविधा तयार करण्यासाठी जी जी बांधकामे करावयाची आहेत. त्यासाठी त्या बांधकामास ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका यांची परवानगी असल्याचे प्रमाणपत्र तसेच संबंधित बाबींचे खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागातील उप अभियंता किंवा नगर परिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषदेतील सक्षम अभियंता यांनी मान्य केलेले असावे.

v. संस्थेकडील एकूण जमिनीपैकी क्रीडांगणासाठी राखून ठेवलेल्या जमिनीबाबतचे हमीपत्र.

उपरोक्त नियमांच्या अधिन राहून अनुदान मंजूर करणचे अधिकार शासनास रहातील . आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत / जिल्हा नियोजन विकास समिती अंतर्गत उपरोक्त परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या संस्थांनी परिशिष्ट अ व ब मध्ये नमूद केलेल्या बाबींसाठी अनुदान घेतले असेल तर त्यांना पुन्हा त्याच बाबींसाठी अर्थसहाय्य या योजनेतून देण्यात येऊ नये.

शासन निर्णय दि २८.नोव्हेंबर १९९५,या शासन निर्णयान्वये अधिक्रमीत करण्यात येत आहे.

सदर नियमात अंशत:/पूर्णत: बदल किंवा शिथील करणचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.

या प्रयोजनार्थ होणारा खर्च त्या त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा व तो खाली नमूद केलेल्या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र.ई-३ लेखाशिर्ष २२०४ क्रीडा व युवक सेवा १०४ क्रीडा व खेळ (४०) क्रीडा सुविधा (४०) (०१) क्रीडा सुविधा निर्मितीसाठी सहाय्य करणे (२२०४ ५७०६) योजनांतर्गत.

हे आदेश या शासन निर्णयाच्या निर्गमित झालेल्या दिनांका पासून पुढील आदेश येईपर्यंत अंमलात येतील.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. अनौस/४१३/व्यय-५ दि. ३.०५.२०१३ नुसार दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०३०११७३४१३७५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2014.03.01 17:40:29 +05'30'

**( रा. चं. पाटील )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
६. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,

८. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
९. सर्व एकविध राज्य संघटना व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन (संचालनालयामार्फत)
१०.सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
११.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),
१२.ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,
१३.मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१४.मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१५.निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३).

## प्रपत्र - अ

## क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य व मर्यादा

(रुपये लाखात)

| अ.क्र. | प्रकल्पाचा प्रकार. | अपेक्षित अंदाजित खर्च | राज्य शासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १. | **क्रीडांगण विकसित करणे.** | | | |
| | फूटबॉल / क्रिकेट / हॉकी या खेळाची प्रमाणित आकाराची मैदाने. (त्या त्या खेळाची गोलपोस्टसह) | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे आठ लेन्सच्या धावनपथासह ग्रास/ सिंडर ट्रॅक | २०.०० | १५.०० | ५.०० |
| | प्रमाणित आकाराचे सिमेंट क्राँक्रिट बास्केटबॉल कोर्ट (पोस्ट व बोर्डसह) | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे ( मुरुम ) टेनिस कोर्ट | १०.०० | ७.५० | २.५० |
| २. | **बंदिस्त प्रेक्षागह** | | | |
| | ४० x २५ x १२.५ मी आकारापेक्षा कमी नसलेले (वुडन/सिंथेटिक फ्लोअरींगसह) चेंजींग रुम्स व स्वच्छतागृहे व प्रसाधनगृहासह | १२०.०० | ९०.०० | ३०.०० |
| | ३५ x १९ x १२.५ मी आकारापेक्षा कमी नसलेले (वुडन / सिंथेटिक फ्लोअरींगसह) | ९०.०० | ६७.५० | २२.५० |
| | १७ x १७ x ७ मी. आकारापेक्षा कमी नसलेले (वुडन / सिंथेटिक फ्लोअरींगसह) | ४०.०० | ३०.०० | १०.०० |
| ३. | **क्रीडा सुविधा.** | | | |
| | १८० x १०० मी मैदान आणि आठ लेन्सच्या धावनपथ, चेंजिंग रुम, प्रसाधनगृह | ३६.०० | २७.०० | ९.०० |
| | १८० x १००मी. आकारापेक्षा कमी नसलेले मैदान ग्रास/सिंडर सहा लेनचा धावनपथ, चेंजिंग रुम, प्रसाधनगृह | ३०.०० | २२.५० | ७.५० |
| | जलक्रीडा सुविधा, साहसी खेळांची सुविधा व साहित्य जलतरण तलावाव्यतिरिक्त (बोट हाऊस, जे.टी.ई व क्लाईंबिंग वॉल,) | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| | स्केटींग रिंक (आऊट डोअर) सिमेंट कॉंक्रीट फ्लोअरींग आकार ४० x २० मी. / बॅडमिंटन,टेनिस, व्हॉलीबॉल वुडन/सिंथेटिक फ्लोअरिंग. | १०.०० | ७.५० | २.५० |
| | वेलोड्रम ( प्रमाणित आकाराचा ) | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| | शुटींग रेंज. | ५०.०० | ३७.५० | १२.५० |

| अ.क्र. | प्रकल्पाचा प्रकार. | अपेक्षित अंदाजित खर्च | राज्य शासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | ॲस्ट्रोटर्फ हॉकी क्रीडांगण. | ७५.०० | ५६.२५ | १८.७५ |
| | लॉन टेनिस (सिंथेटिक) | २०.०० | १५.०० | ५.०० |
| | जलतरण तलाव<br>(अ) ५० x २१ मी. जलशुध्दीकरण सयंत्राणासह<br>(ब) २५ x २१ मी. जलशुध्दीकरण सयंत्रणासह<br>(क) २५ x १३ मी. जलशुध्दीकरण सयंत्रणासह<br>(जलतरण तलाव ही बाब क्रीडा धोरणात मुद्दा क्र. ४.७ (अ) मध्ये मंजूर आहे. क्रीडा सुविधेत एकसुत्रता आणण्यासाठी सदर बाबीचा या ठिकाणी समावेश करण्यात येत आहे. | १२०.००<br><br>६०.००<br>५०.०० | ९०. ००<br><br>४५.००<br>३७.५० | ३०.००<br><br>१५.००<br>१२.५० |

**प्रपत्र – ब**

**क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य व मर्यादा**

**(रुपये लाखात)**

| अ.क्र | क्रीडा प्रकार | क्रीडा साहित्य | अनुदान मर्यादा | राज्य शासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **ॲथलेटिक्स** | थाळी, गोळा ,भाला, ॲथलेटिक्स मार्किंग कोन्स, स्टार्टींग ब्लॉक्स, रिले बॅटन्स, हर्डल्स, हायजंम्प व पोलव्हॉल्ट क्रॉसबार, लांब , उंचउडी व पोलव्हॉल्ट टेक ऑफ बोर्ड, हायजंप व पोलव्हॉल्ट पिट, गोळा टो बोर्ड, हर्डल्स, स्टार्टर रोर्स्टम, स्पाईक | १०.०० | ७.५० | २.५० |
| २ | **फूटबॉल** | फूटबॉल,गोलकिपर ग्लोव्हज,कोन,फूटबॉल नेट, किकिंग बोर्ड, गोलपोस्ट, कॉर्नर फ्लॅग, रेफरी फ्लॅग, | ४.०० | ३.०० | १.०० |
| ३ | **हॉकी** | हॉकी गोलकिपर कीट ,हॅण्ड ग्लोव्हज, हॉकी टर्फ बॉल, गोल पोस्ट सेट, प्रॅक्टिस नेट, स्टीक केस, स्टीक यु ब्लेड कार्बन, फायबर ग्लास, हिटींग बोर्ड, कोन,शिनगार्ड्स | ४.०० | ३.०० | १.०० |
| ४ | **टेनिस** | टेनिस बॉल,टेनिस नेट, लॉनटेनिस पोल (स्लिवससहित) | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| ५ | **बॅडमिंटन** | बॅडमिंटन नेट, बॅडमिंटन पोल, | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| ६ | **वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग** | रबर कोटेड बारबेल सेट, वेटलिफिटंग बेल्ट, वेटलिफिटंग प्लॅटफॉर्म, | ४.०० | ३.०० | १.०० |
| ७ | **कुस्ती** | कुस्ती मॅट (१२ X १२ मी.सेट सिंथॅटिक कव्हरसह)/डमीज् | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| ८ | **व्हॉलिबॉल** | व्हॉलिबॉल, व्हॉलिबॉल नेट, व्हॉलिबॉल पोल, ॲटीना फायबर ग्लास, | ०.७५ | ०.५६ | ०.१९ |
| ९ | **खो खो** | पोल (टीकवूड) १ जोडी. | ०.२५ | ०.१८ | ०.०६ |
| १० | **बॉक्सींग** | ग्लोव्हज टेन ऑन्स रेड ब्ल्यू , पंचींग पॅड, पंचींग बॅग, हेड गियर रेड-ब्ल्यू, पंचींग ग्लोव्हज बॉक्सिंग रींग, | ४.०० | ३.०० | १.०० |
| ११ | **रस्सीखेच** | १.५" रस्सी | ०.२५ | ०.१८ | ०.०६ |
| १२ | **हॅण्डबॉल** | हॅण्डबॉल, गोलपोस्ट, नेट | १.०० | ०.७५ | ०.२५ |

| अ.क्र | क्रीडा प्रकार | क्रीडा साहित्य | अनुदान मर्यादा | राज्य शासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १३ | **जलतरण** | पाम पुलर,किक बोर्ड,पुल बॉय, लाईफ जॅकेट, बॅरल फ्लोट, आर्म फ्लोट लेन, लाईफ बॉय, फ्लोटलेन, डॉयव्हिंग बोर्ड, डॉयव्हिंग बोर्ड स्टॅन्ड | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| १४ | **जिम्नॅस्टिक्स** | बॅलसिंग बिम,अनइव्हन बार, हॉरिझॉन्टल बार,पॉमेल हॉर्स, पॅरलल बार, रोमन रिंग, व्हॉल्टिंग टेबल, जिम्नॅस्टिक्स बेंचेस, बीट बोर्ड -फाइव्ह स्प्रिंग्स, थ्रीज स्प्रिंग्स, वॉल बार्स फॉर टू सेक्शन, रोमन रिंग्ज, स्पॉटिंग बेल्ट, फ्लोअर प्लेट, मुशरुम हॉर्स, स्पेअर पॉमेल, ट्रॅम्पोलिन, फ्लोअर एक्सरसाईज मॅट, रिदमिक साहित्य. (रोप., बॉल, रिबन,क्लब) | १५.०० | ११.२५ | ३.७५ |
| १५ | **कबड्डी** | सिंथेटिक मॅट्स | ४.०० | ३.०० | १.०० |
| १६ | **बास्केटबॉल** | बास्केटबॉल,नेट, पोल | ४.०० | ३.०० | १.०० |
| १७ | **टेबलटेनिस** | टेबल, रोबो (multy program) | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| १८ | ज्युदो, तायक्वादो, कराटे | मॅट्स | ४.०० | ३.०० | १.०० |
| १९ | **मल्लखांब व रोप मल्लखांब** | पोल, रोप, रोप मल्लखांब स्टॅन्ड. | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| २० | **शुटींग** | इलेक्ट्रॉनिक पुली,टारगेट, एअर रायफल, एअर पिस्तुल, लाईटस्टॅण्ड, रायफल स्टॅण्ड, पॅलेट | १०.०० | ७.५० | २.५० |
| २१ | **टेनिस/क्रिकेट** | टेनिस रोबो मशीन/क्रिकेट बॉलिंग मशीन. | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| २२ | **मल्टिजीम / ट्रेडमिल / सायकलिंग / अद्यावत व्यायामसाहित्य** | १ स्टेशन, ४ स्टेशन, ६ स्टेशन, १० स्टेशन, १२ स्टेशन, १६ स्टेशन मल्टिजिम. तसेच आधुनिक अद्यावत व्यायाम साहित्य. | ७.०० | ५.२५ | १.७५ |